भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०५/२०१७

**१) जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करतांना साहीत्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०५/२०१७ ते ०१.३० वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपी हे हिरोहोंडा सीडी १०० मोटार सायकल क्रमांक एमएच ३१/एटी ८१०४ किंमती १५,०००/–रु. ची ने रात्री शस्त्रानिशी जबरी चोरी किंवा दरोडा घालण्याचे पुर्व फिक्कट खाकी रंगाची बॅग ज्यावर फेसबुक पांढरे पेटने लिहलेली, लोखंडी हातोडी लोखंडी दांडयासह, १ लोखंडी एल आकाराचा भरीव रॉड, १ लोखंडी तलवार, असा एकुण १५,१८५/–रु. चे साहित्य मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी घुसर यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम ३९८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. सोनटक्के स्थागुशा भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) दारु पिण्याच्या कारणावरुन भांडण झाल्याने अंगावर रॉकेल घालुन अंगावरील कपडयाला आग लागुन जखमी झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०५/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी सौ. जमना अमरनाथ जरबान उईके वय ३६ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा हिचा आरोपी पती हा दारु पिवुन घरी आला दारु पिल्याच्या कारणा वरुन फिर्यादीचे व आरोपीचे भांडण झाले आरोपीने फिर्यादीला 'तुला जिवंत जाळतो' असे बोलुन फिर्यादीचे अंगावर बाटली मधील रॉकेल घालुन जळती चिमणी(दिवा) अंगावर टाकला त्यामुळे फिर्यादीचे अंगावरील कपडयाला आग लागुन जखमी झाल्याने फिर्यादींचे बयाणा वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन शासकीय दस्ताऐवजामध्ये बेकायदेशिर दुरुस्ती करुन दुसरा व्यक्ती उभा करुन तोतयागिरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०६/२०१६ चे पुर्वी यातील तेराही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे वडीलाचे जागी दुसरा व्यक्ती उभा करुन तोतयागिरी केली तसेच शासकीय दस्ताऐवजामध्ये बेकायदेशिर दुरुस्ती करुन तो बनावट तयार केला व खरा म्हणुन वापरल्याबाबत फिर्यादीने मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट ४ थे भंडारा यांचे कडे दाखल केलेली लेखी फिर्यादी तसेच मा. न्यायालयाचे जावक क्र. २०७/१७ अन्वये कलम १५६(३) सीआरपीसी अन्वये पोस्टे. भंडारा येथे कलम ४२६,४१९,४६०,४७१,४७३,३४ भांदवि. गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) भांडण व शिवीगाळ करुन हाता बुक्यांने व लोखंडी रॉडने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ओमकारसिंग गुरुसिंग टाक वय १६ वर्ष, रा. ताडेश्वर वार्ड पवनी हा साई कृपा हिरो शोरुम मध्ये काम करीत असतांना यातील आरोपी हा शोरुम मध्ये येवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन फर्शी साफ करण्याचे पोच्याने व हाता बुक्यांने गालावर, पोटावर मारुन तसेच लोखंडी रॉड फिर्यादीचे पाठीवर, उजवे हाताचे अंगठयावर मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम ४५२,३२३,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन बिअरची बॉटल फोडुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/०५/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रविंद्र प्रभाकर भांडारकर वय ४४ वर्ष, रा. पदमा वार्ड पवनी व त्याचा मित्र जख्मी अनिल गजाणनराव बन्सोड रा. पवनी याचेसह सनशाईन बिअरबारमध्ये दारु पिण्यासाठी गेले असता आरोपी हा त्याचे बाजुला सोफ्यावर येवुन बसल्याने जखमी याने आरोपीस 'तु आमचे बाजुला बसु नको' असे बोलुन निघुन जाण्यास सांगितल्याने आरोपी उठुन जात असता जखमीने बार मालकास फोन करुन तु कसेकसे माणसे आपल्या बार मध्ये बोलावते असे बोलत असता आरोपीने ऐकल्याने बिअरची बॉटल फोडुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) गैरकायदयाची मंडळी जमवुन हिरो शोरुम मध्ये जबरीने प्रवेश करुन शिवीगाळ,प्लास्टीक खुर्चीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोदं . :—**

दिनांक १२/०५/२०१७ चे १७.१५ वा. दरम्यान यातील सहाही आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे साई कृपा हिरो शोरुम मध्ये जबरीने प्रवेश करुन फिर्यादीचे हाताला लोखंडी पाईप व प्लास्टीक खुर्चीने मारुन जखमी करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी किशोर विश्वनाथ जिभकाटे वय ३४ वर्ष, रा. कोदुर्ली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम ४५२,१४३,१४७,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक १२/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा व तुमसर येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारु किंमती ३,०००/रु. चा माल जप्त करण्यात आला आहेत.

(बी. आर. गाडे)
पोनी. जिवीशा भंडारा
करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.